पोलीस अधीक्षक , कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gov.in

# प्रेसनोट क्र. ११ दिनांक २८/०१/२०२३

# राष्ट्रीय लोकअदालतमध्ये पालघर जिल्ह्यातील अनपेड ई-चलान वाहनधारकांनी दि.१०/०२/२०२३ रोजीपर्यंत दंड भरणे बाबत.

याव्दारे असे आवाहन करण्यात येते की, राज्यात महाराष्ट्र शासनाचा **"वन स्टेट वन ई-चलान"** माहे एप्रिल २०१९ पासून संपुर्ण पालघर जिल्हयात कार्यान्वित झालेला असुन वाहतुक नियंत्रण शाखेकडून नियमांचे उल्लंघन करणारे वाहनधारक चालकांवर ई-चलान प्रणालीव्दारे कारवाई करण्यात येत आहे. पालघर जिल्ह्यातील आजपावेतो दंड न भरलेले वाहनधारक यांचे चलनाची संख्या एकुण ३५,०७३ इतकी असुन त्या अनपेड चलनाची रक्कम रुपये ३,३०,२६,८२५/- रुपये इतकी आहे. सदरची दंडाची रक्कम ही खुप मोठया प्रमाणात आहे. सदर ई-चलान प्रणालीद्वारे कारवाई अनपेड ई-चलान करण्यात आलेल्या वाहनाधारकांना एसएमएस संदेशाद्वारे सदर चलनाची तडजोड भरणेबाबत सुचना देण्यात येतात. परंतु बऱ्याच वाहनधारकाने अदयापपावेतो अनपेड ई-चलान तडजोड रकमेचा भरणा केलेला नाही. अशा वाहन धारकांसाठी पुन्हा संधी देण्यासाठी मा. विधी व न्यायप्राधीकरण विभाग, पालघर यांचे मार्फत व मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालयातून संबंधीत ई-चलान वाहनधारकांना एसएमएस संदेशाद्वारे/नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की दि.१०/०२/२०२३ पर्यंत अनपेड ई-चलान वाहनधारकांनी तडजोड रकमेचा खालील नमुद ठिकाणी भरणा करावा. सदर अवधीमध्ये भरणा न केल्यास त्यांना प्राप्त एसएमएस संदेशाद्वारे संदेशाप्रमाणे दि.११/०२/२०२३ रोजी राष्ट्रीय लोकअदालतमध्ये हजर राहावे लागणार आहे. तडजोड रकमेचा भरणा केल्यास लोकअदालतमध्ये हजर राहण्याची आवश्यकता नाही.

खालील नमुद ठिकाणी अनपेड ई चलान तडजोड रकमेचा भरणा करु शकता.

१ **रोख्र रक्कम रोख्र स्वरुपात अथवा डेबीट कार्डद्वारे, क्रेडीट कार्डद्वारे, जिल्हा वाहतुक शाखा व चाररस्ता चौकी, पालघर स्टेशन चौकी, जिल्हा वाहतुक शाख्रा पालघर, पोलीस अधीक्षक कार्यालय पालघर येथे भरु शकता.**

२ **चलान केल्यास त्यानंतर समोरील व्यक्तीला त्याचे मोबाईल एसएमएसद्वारे गेलेल्या संदेशमधील लिंक ओपन करुन अनपेड रक्कम भरता येते.**

३ **जवळचे पोलीस ठाणे अथवा वाहतूक अमलदार यांचेकडे ई चलान डिवाईसद्वारे अनपेड रक्कम भरु शकता.**

तरी वरीलप्रकारे आपले वाहनावरील अनपेड दंड हा दि.११/०२/२०२३ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालत पुर्वी भरावा. तसेच कोणाला या मुदतीत दंड भरणे शक्य नसेल त्यांनी यादिवशी होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालमध्ये आपआपले जवळील कोर्टात दंड भरावा तसेच वाहनधारकांनी आपले वाहनांवरील अनपेड दंड भरलेनंतर त्याची रितसर पावती घ्यावी व आपले वाहनावरील दंड वसूल झाला आहे अगर कसे याची माहिती वाहतुक पोलीस अधिकारी अथवा पोलीस अंमलदार यांचेकडून घ्यावी. तरी वाहतूक नियमांचे पालन करुन नागरीकांनी पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन पोलीस अधीक्षक पालघर व जिल्हा वाहतुक शाख्रा पालघर यांचेकडून करण्यात येत आहे.